सकाळ

# समाजजीवन हृदयातून अवतरल्यास सकस, समृद्ध साहित्यनिर्मिती

## प्राचार्य डॉ. गिरासे : मुंबईत एकदिवसीय व्यक्ती, साहित्य विषयावर परिसंवाद

■ **सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. १९ : साहित्याच्या प्रचंड ढिगाऱ्यात सकस साहित्य लिहिणारे साहित्यिक अगदी बोटावर मोजण्याइतके आहेत. अभ्यास, निरीक्षण, परिश्रम व प्रामाणिकपणे साहित्य सेवा करणाऱ्या साहित्यिकांची वानवा आहे. समाजजीवन जेव्हा हृदयातून, वैचारिक परिपक्वतेतून अक्षररूपाने कागदावर अवतरते, तेव्हा निर्माण झालेले साहित्य हे सकस आणि समृद्ध असल्याचे मत कथा कादंबरीकार प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी व्यक्त केले.

मुंबई (घाटकोपर) येथील के. जे. सोमय्या कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी प्रबोधन मंडळ यांच्यातर्फे 'शांताबाई शेळके : व्यक्ती आणि साहित्य' या विषयावर एकदिवसीय परिसंवादातील दुसऱ्या सत्रात प्राचार्य डॉ. गिरासे बोलत होते.

ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे अध्यक्षस्थानी होते. समीक्षक डॉ. रागिणी चंद्रात्रे यांच्यासह 'पानिपत'कार विश्वास पाटील, नवी दिल्लीचे साहित्य अकादमीचे सचिव श्रीनिवासराव, साहित्य अकादमीचे केंद्रीय सदस्य डॉ. नरेंद्र पाठक, मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव, डॉ. बळिराम गायकवाड, कवी अशोक बागवे, प्राचार्य डॉ. किशोर पवार, ओम नागर, कवी प्रवीण दवणे, किरण डोंगरदिवे, डॉ. सुनीता सांगोले, ॲड. बलदेव राजपूत यांच्यासह साहित्य क्षेत्रातील अनेक जण उपस्थित होते. मीरा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. मराठी विभागप्रमुख प्राध्यापक अभिजित देशपांडे यांनी आभार मानले.




**मुंबई** : सोमय्या महाविद्यालयात साहित्य अकादमीच्या परिसंवादात बोलताना प्राचार्य डॉ. संजीव गिरासे.

### कोण काय म्हणाले...

'कवयित्री शांताबाई शेळके यांनी आपल्या कथा, कादंबरी, काव्य, ललित गद्य आणि चित्रपटगीतांतून सामाजिक परंपरा, सण, उत्सव चित्रित करताना समाजभान पाळलेले आहे. समाजाचा परीघ, समाजाची चौकट त्यांच्या साहित्यातून अबाधित राहिल्यामुळे त्यांचे साहित्य हे तत्कालीन समाजाचा शोध घेण्यासाठी उपयुक्त ठरते. या वेळी डॉ. रागिणी चंद्रात्रे यांनी कवयित्री शांताबाई शेळके यांच्या कवितेतील स्त्रीजीवन अत्यंत समर्पक शब्दांत मांडले. कवी अरुण म्हात्रे यांनीदेखील शांताबाई शेळके यांच्या कवितेतील विविध रूपे, प्रतीके, प्रतिमा, निसर्ग यांची अभ्यासपूर्ण मांडणी करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.